# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
## कृषि नगर, अकोला.

ग्राम : युनिव्हर्सीटी
दुरध्वनी : ००९१-०७२४-२२५८३८६
फॅक्स् : ००९१-०७२४-२२५८३७२


## परिपत्रक

जा.क्र. साप्रवि/जीएससी/ध्वजदिननिधी-१७/ ४९३६ /२०१८. दिनांक :- १८/०२/२०१८.

मा. जिल्हाधिकारी यांनी त्यांचे अ.शा. पत्र क्र. १३०२/ध्व. नि-१७/जिसैकका, दिनांकः- ०७ डिसेंबर, २०१७ नुसार आवाहन केले आहे की, २०१७ चा ध्वजदिन निधी संकलना करिता महाराष्ट्र शासनाने अकोला जिल्हयास यावर्षी ६८,३०,२०८/- चे उद्दीष्ट दिले आहे.

करिता आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या अंधिनस्त कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी यांचे कडुन सोबत जोडलेल्या पत्रामध्ये दर्शविलेल्याप्रमाणे या कल्याणकारी व राष्ट्रीय कार्यास हातभार लावण्याकरिता सशस्त्र सेना ध्वजदिन २०१७ निधी संकलनाकरिता सक्रीय योगदान देऊन संकलित झालेला निधी कृपया बँक ड्राफ्ट / धनादेश स्वरूपात '**जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा सैनिक कार्यालय, अकोला**' यांचे नावाने जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अकोला ४४४००१ (दुरध्वनी क्र. ०७२४२४३३३७) येथे दिनांक **३१ मार्च २०१८** पुर्वी जमा करावे. तसेच केलेल्या कार्यवाहीची प्रत माहितीकरिता या कार्यालयास पाठवावी.

सोबतः- वरिलप्रमाणे.

कुलसचिव
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला.

प्रत :

१) संचालक (सर्व) डॉ. पं.दे. कृ. वि., अकोला.
२) अधिष्ठाता (सर्व) डॉ. पं.दे. कृ. वि., अकोला.
३) सहयोगी अधिष्ठाता (सर्व)....................................... डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला.
४) विभाग प्रमुख (सर्व) ........................................... डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला.
५) वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व)..................................... डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला.
६) नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल/विद्यार्थी कल्याण अधिकारी, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला.
७) कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिकारी (सर्व) -------------------------------------------------------
८) मा. कुलगुरू महोदय /कुलसचिव महोदय यांचे स्वीय सहायक यांना माहीतीकरिता.
९) वेतन व लेखाधिकारी, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला.
१०) ........................................................................डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला.

प्रत सस्नेह अग्रेषित :

१. मा. जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अकोला यांना माहीतीकरिता सविनय सादर.

C/3

# जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अकोला.

## सशस्त्र सेना ध्वजदिन २०१७ निधी संकलन शुभारंभ

# आवाहन

१. माजी सैनिकांच्या व त्यांच्या कुंटुबियांच्या कल्याणकारी कार्यक्रमाचे महत्व लक्षात घेण्याकरिता ध्वजदिन म्हणून **०७ डिसेंबर** हा दिवस संपूर्ण देशात पाळला जातो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपल्या स्वातंत्र्याची अमर ज्योत सतत तेवत ठेवून मातृभूमीचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचे महान कार्य देशाच्या शूर सैनिकांवर आहे याची जाणीव आपणा सर्वांना आहे.

२. सध्या देशाच्या सीमेवरील वातावरण अत्यंत अशांत आहे. जवळजवळ युध्दासारखीच परिस्थिती आहे. शहीद सैनिकांची दररोज वाढत जाणारी यादी आपण भारतवासीयांना अस्वस्थ करीत असते. सारे जनमानस क्रोधीत असतांना आपली सैन्यदले मात्र अत्यंत संयमाने परंतु प्रखर व प्रभावी कार्यवाही करीत आहे. ही बाब आपणासाठी अभिमानाची आहे.

३. युध्द क्षेत्रात किंवा अतिरेकी कार्यवायांमध्ये मातृभुमीच्या रक्षणासाठी आत्मबलिदान करून वीरगती लाभलेल्या लष्करातील जवानांच्या बलिदानाची परतफेड अंशतः का होईना आपण त्यांच्या कुटुंबियांचे / अवलंबितांचे पुनर्वसन करून करू शकतो. याकरिता गरज पडते ती म्हणजे ध्वजदिन निधीची. युध्दक्षेत्रात किंवा अतिरेकी कारवायंमध्ये शहीद झालेले, अपंगत्व आलेले जवान तसेच माजी सैनिक व त्यांचे कुटुंबिय यांचे साठी महाराष्ट्र शासन निरनिराळ्या कल्याणकारी योजना राबवित आहे. या योजनाकरिता लागणारा खर्च ध्वजदिन निधी संकलन करून उभारला जातो.

४. या वर्षी सशस्त्र सेना ध्वजदिन २०१७ निधी संकलित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जिल्ह्यास **रू. ६८,३०,२०८/** चे उद्दिष्ट दिले आहे. या राष्ट्रीय कार्यास सर्वच विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, संघटना तसेच शाळा /महाविद्यालये, व्यापारी वर्ग, कारखानदार तसेच सर्वसामान्य नागरिक सक्रिय हातभार लावीत असतात.

५. अकोला जिल्ह्यातील सर्वच विभाग, कार्यालये, महाविद्यालये, शाळा, इतर शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच कारखानदार, सहकारी संस्था इत्यादि दरवर्षी पेक्षाही जास्त सहकार्य करून अकोला जिल्ह्याचे ध्वजदिन निधी संकलनाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यास आपले सर्व स्तरांवर सक्रिय योगदान करतील याचा मला पूर्ण विश्वास आहे.

६. जिल्हाधिकारी व अध्यक्ष, ध्वजदिन निधी संकलन समिती, अकोला या नात्याने मी आवाहन करीत आहे की प्रत्येकाने हा निधी उभारणीसाठी सर्वोतोपरी सहाय्य करावे व कल्याणकारी राष्ट्रीय कार्यास हातभार लावावा.

# सशस्त्र सेना ध्वजदिन निधीस सढळ हाताने मदत करा

७. सर्व कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची वर्गवारी लक्षात घेऊन त्यांचे कडून खालील प्रमाणे योगदान मिळावे असे आवाहन मी या पत्रकाव्दारे करीत आहे :

| | | |
|---|---|---|
| अ. | उच्च पदस्थ वरिष्ठतम अधिकारी कुलगुरू, जिल्हाधिकारी पोलिस अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, आयुक्त (म.न.पा.) प्राचार्य, विद्यापीठातील प्राध्यापक, प्रादेशिक विभाग प्रमुख | रू. २०००/ प्रत्येकी |
| ब. | अधिकारी वर्ग १ (कार्यालय प्रमुख, अधिव्याख्याते) | रू. १५००/ प्रत्येकी |
| क. | अधिकारी वर्ग २ व तत्सम दर्जाचे अधिकारी, मुख्याध्यापक (माध्यमिक शाळा) इ. | रू. ७००/ प्रत्येकी |
| ड. | वर्ग ३ चे कर्मचारी, मुख्याध्यापक (प्राथमिक शाळा) माध्यामिक / प्राथमिक शाळांचे शिक्षण प्रत्येकी | रू. ५००/ प्रत्येकी |
| इ. | वर्ग ४ चे कर्मचारी | रू. २००/ प्रत्येकी |

८. विद्यार्थी वर्गामध्ये या राष्ट्रीय कार्याचे महत्व कळावे या हेतुने त्यांचेकडून सुध्दा रू. १०/ प्रति विद्यार्थी संकलन प्रत्येक शाळा / महाविद्यालये यांचे तर्फ करण्याचा प्रयत्न करावा.

९. जिल्ह्यातील सर्व सामान्य नागरीकांनी देशप्रेमाची भावना जपून प्रत्येकाने या कामी सढळ हाताने योगदान करावे.

१०. संकलित झालेला निधी कृपया **बँक ड्राफ्ट/ धनादेश** स्वरूपात **'जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अकोला'** यांचे नावाने **जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अकोला ४४४००१** (दुरध्वनी क्र. ०७२४२४३३३७७) येथे ३१ मार्च २०१८ पूर्वी जमा कराल असा मला पूर्ण विश्वास आहे.

धन्यवाद !

आपला स्नेहांकित,

स्थळ : अकोला
दिनांक : ०७ डिसेंबर २०१७

**आस्तिककुमार पाण्डेय**
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अकोला.

प्रति, ____________________

____________________